| | |
|---|---|
| MHSN060009272021 | R.C.S.142/2021<br>Dilip Dadu Kamble Vs. Savitribai Gulab Kamble |

## निशाणी २७ वरील आदेश

०१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–६, नियम–१७ व कलम १५१ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी केला आहे.

०२. वादीने असे कथन केले आहे की, प्रकरण प्रलंबित असताना प्रतिवादी नं. १ सावित्रीबाई गुलाब कांबळे यांचे दिनांक २०.०४.२०२४ रोजी निधन झालेले आहे. प्रकरणातील प्रतिवादी नं. २ प्रकाश गुलाब कांबळे हे प्रतिवादी नं. १ यांचा मुलगा आहे. प्रतिवादी नं. १ यांना त्यांचेशिवाय अन्य कोणी कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे मयत प्रतिवादी नं. १ यांचे स्वतंत्र कायदेशीर वारस रेकॉर्डवर आणणेची आवश्यकता नाही. सबब निशाणी १ मध्ये मयत प्रतिवादी नं. १ यांचे नावासमोर त्याबाबत दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे वादीने अर्जात नमूद केलेप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादीतर्फे सदर अर्जास म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, अर्ज खोटा व चुकीचा आहे. वादीने मयत प्रतिवादी नं. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास जाणूनबुजुन विलंब केलेला आहे. अर्जातील कारण संयुक्तिक नसलेने अर्ज नामंजूर करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

०४. वादीचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. वादीचे सदर अर्जावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी नं. १ चे वारस पूर्वीपासूनच अभिलेखावर आहेत. प्रतिवादी नं. १ या मयत झालेने त्याप्रमाणे केवळ दाव्यातून त्यांचे नाव कमी करणेत यावे अशी वादीने विनंती केली आहे. वादीने सदर अर्जाद्वारे मागितलेली दुरुस्ती प्राथमिक स्तरावर आवश्यक स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादीस दावा दुरुस्तीनंतर त्याचे म्हणणे देण्याचा हक्क असल्याने, सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादीचे नूकसान

होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरची दुरुस्ती मंजूर होणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील असलेला वाद संपुष्टात आणणेसाठी व न्यायदानासाठी मदत होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने दुरुस्ती अर्जामध्ये नमूद केलेप्रमाणे दाव्यामध्ये नियोजीत दुरुस्ती विहीत कालावधीत करणेस परवानगी देण्यात येते.

३. वादीने दुरुस्त वादपत्राची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादीसाठी दयावी.

ANIRUDHA SUNIL RANE Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE

ठिकाण –मिरज.
दिनांक –२२.०८.२०२५.

(अनिरुध्द एस. राणे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

-

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana |
| Name of Court | :- | Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist.Sangli. |
| Date of decision / typed | :- | 22.08.2025 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 22.08.2025 |
| Judgment/order uploaded on | :- | 22.08.2025 |